पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८७**

(सभावृत्तांत)

**दिनांक – ०२/०९/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार** दिनांक **०२/०९/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा. सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा. सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

या शिवाय मा.इंदलकर - नगरसचिव हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तर मा.संतोष पाटील – अतिरिक्त आयुक्त (१), मा.कुंभोजकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.निकम – सह शहर अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

----------

सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसलेने उपस्थित सन्मा.सदस्यांनी सदरची सभा बुधवार दिनांक ०९/०९/२०२० रोजी दुपारी २.१५ वाजेपर्यंत तहकूब करणेत येत आहे.

**( चंद्रकांत इंदलकर )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १८७**

( दिनांक ०२/०९/२०२० दु.२.३० वा. ची तहकूब सभा )

**दिनांक – ०९/०९/२०२०** **वेळ – दु. ०२.१५ वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.०२/०९/२०२० दु.२.३० वा. ची **तहकूब** सभा **बुधवार दि.०९/०९/२०२०** रोजी दु**.०२.१५** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते. तसेच काही सन्मा.सदस्य व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
५. मा.कलाटे राहुल तानाजी
६. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
८. मा.संतोष बबन कांबळे
९. मा.अभिषेक गोविंद बारणे
१०. मा.फुगे भिमाबाई पोपट
११. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१२. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर–आयुक्त, मा.पाटील-अति.आयुक्त(१), मा.पवार-अति.आयुक्त(२), मा.तुपे-अति.आयुक्त(३), मा.इंदलकर-नगरसचिव, मा.इंगळे – उप आयुक्त, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.निकम, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत – सहाय्यक आयुक्त, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.गलबले, मा.घोडे, मा.गट्टूवार, मा.वाघुंडे, मा.काळे – कार्यकारी अभियंता, मा.गोफणे– आरोग्य अधिकारी, मा.माने – लेखाधिकारी PMPML हे अधिकारी सभागृहात उपस्थित राहून तसेच मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.कोळंबे–मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.जोशी, मा.दुरगुडे-सहाय्यक आयुक्त, मा.ओंभासे, मा.भोसले, मा.मोरे, मा.देशमुख, मा.टकले, मा.धुमाळ– र्यकारी अभियंता हे अधिकारी व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते.

ठराव क्रमांक – ७३९६ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – पर्यावरण अभियांत्रिकी

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पअक/१/कावि/८४/२०२०, दि.१७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV4/4-2019-20 अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पुढील पाच वर्षासाठी पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणेसाठी अनुभवी एजन्सीजची नेमणुक करणेकामी मे.स्काय लॅब अनायटीकल लॉबरोटरी यांचेकडुन निविदा र.रु.५०,८०,०००/- वर निविदा दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदारांकडून र.रु.५०,८०,०००/-पेक्षा -१६.२५% कमी दराने म्हणजेच र.रु.४२,५४,५००/- (अक्षरी र.रू.बेचाळीस लाख चोपन्न हजार पाचशे फक्त) पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेसतसेच निविदा अटी नुसार भाववाढ कलम लागु असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९७ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – क मुख्यालय, स्थापत्य

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/क-मुख्य/२८९/२०२०, दि.१९/०८/२०२०

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.67/6/2019-20 अन्वये प्रभाग क्र.६ मध्ये सेवा वाहिण्यांसाठी खोदलेल्या चरांचे खडीकरण व बी.बी.एम. करणेकामी मे.बहिरट ब्रदर्स नि.र.रू.30,44,490/- (अक्षरी र.रु.तीस लाख चव्वेचाळीस हजार चारशे नव्वद फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,25,126/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,25,126/- पेक्षा 25.52% कमी म्हणजेच र.रु.21,78,634/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.70,854/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.48,510/- = एकुण र.रु.22,97,998/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ७३९८ विषय क्रमांक – ०३
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – क क्षेत्रिय
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.कक्षेका/आ/१५/कावि/३६६/२०२०, दि.२०/०८/२०२०

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मागविलेल्या निविदा नोटीस क्र.1/2019-2020 क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील (क क्षेत्रीय कार्यालयाचे कार्य़क्षेत्रात औष्णिक धुरीकरण करण्यासाठी वॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेलवर चालणारे तीनचाकी रिक्षाटेम्पो (चार रिक्षा टेम्पो) वाहनचालकासह भाड्याने घेणेकामी मे.महालक्ष्मी एंन्टरप्रायजेस या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा -9.80% टक्के कमी दराची स्विकृत करणेत आली असून चार वाहनांच्या दोन वर्षाकरीता येणा-या खर्च र.रू.31,51,714/- (अक्षरी र.रू.एकतीस लाख एक्कावन्न हजार सातशे चौदा फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३९९ विषय क्रमांक – ०४
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – ड क्षेत्रिय, विद्युत
सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालुका आयुक्त यांचे पत्र क्र.डक्षे/वि/वाकड/१८१/२०२०, दि.१८/०८/२०२०

मा.महापालुका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ड क्षेत्रीय विद्युत विभागांतर्गत सन २०१९-२० मधील व त्यापूर्वीच्या चालू असलेल्या किरकोळ देखभाल दुरूस्ती व विविध विकास कामांची बिले माहे मार्च २०२० मध्ये जगभरात कोरोना विषाणूचा प्रसार झाल्याने लॉकडाऊन जाहीर करण्यात आले व संचारबंदी लागू करण्यात आली. सन २०१९-२० मध्ये एकूण २० कामांची बिले अदा करणे प्रलंबित होती. परंतु वरील आपत्कालीन परिस्थीमुळे सदरची बिले अदा करता आलेली नाही. तरी प्रस्तावात नमूद प्रमाणे सदरची बिले संबंधितांस अदा करणे आवश्यक असलेने त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०२ अन्वये मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | कामांची संख्या | अदा करावयाची र.रु. |
|---|---|---|---|
| १ | ड क्षेत्रीय विद्युत विभाग | १७ | ४१,५९,४१३/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०० | विषय क्रमांक – ०५
दिनांक – ०९/०९/२०२० | विभाग – झो.नि.पु., स्थापत्य
सुचक – मा.झामाबाई बारणे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५७३/२०२०, दि.२०/०८/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/१६-२०१९-२० मधील अ.क्र.०६ अन्वये रामनगर झोपडपट्टी चिंचवड येथे स्थापत्य विषयक विविध विकास कामे करणेकामी मे.जे.पी.इन्फ्रा. नि.र.रु.३३,७१,८८९/- (अक्षरी र.रु.तेहतीस लाख एकाहत्तर हजार आठशे एकोनव्वद फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळुन र.रू.३३,२६,९९९/- वर निविदा मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रू.३३,२६,९९९/- पेक्षा २५.८१% कमी म्हणजेच र.रु.२४,६८,३०१/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.२,९४०/- मटेरीयल टेस्टींग चार्जेस र.रु.४१,९५०/- = एकुण र.रु.२५,१३,१९१/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०१ | विषय क्रमांक – ०६
दिनांक – ०९/०९/२०२० | विभाग – झो.नि.पु., स्थापत्य
सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५७४/२०२०, दि.२०/०८/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/१६-२०१९-२० मधील अ.क्र.०७ अन्वये विद्यानगर झोपडपट्टी चिंचवड येथे स्थापत्य विषयक विविध विकास कामे करणेकामी मे.जे.पी.इन्फ्रा. नि.र.रु.२५,३८,०९०/- (अक्षरी र.रु.पंचवीस लाख अडतीस हजार नव्वद फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळुन र.रू.२४,९३,२००/- वर निविदा मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रू.२४,९३,२००/- पेक्षा २५.७१% कमी म्हणजेच र.रु.१८,५२,१९८/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.२९४०/- मटेरीयल टेस्टींग चार्जेस र.रु.४१,९५०/-=एकुण र.रु.१८,९७,०८८/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटीनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमामुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहूनत्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०२ विषय क्रमांक – ०७

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – झो.नि.पु., स्थापत्य

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/५७५/२०२०, दि.२०/०८/२०२०

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२/१६-२०१९-२० मधील अ.क्र.१४ अन्वये लांडेवाडी झोपडपट्टी येथे समाजभवनाचे बांधकाम करणे व तसेच स्थापत्य विषयक विविध विकास कामे करणेकामी मे.अक्षया एन्टरप्रायजेस नि.र.रु.३४,०९,३९६/- (अक्षरी र.रु.चौतीस लाख नऊ हजार तीनशे शहान्नव फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळुन र.रू.३३,३७,५४३/- वर निविदा मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रू.३३,३७,५४३/- पेक्षा २५.७२% कमी म्हणजेच र.रु.२४,७९,१२७/-+रॉयल्टी चार्जेस र.रु.२१,९०३/- मटेरीयल टेस्टींग चार्जेस र.रु.४९,९५०/-=एकुण र.रु.२५,५०,९८०/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटी नुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमामुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०३ विषय क्रमांक – ०८

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – फ क्षेत्रिय, आरोग्य

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे पत्र क्र.फक्षेका/आ/२/कावि/२५३/२०२०, दि.१९/०८/२०२०

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

फ क्षेत्रीय कार्यालयअंतर्गत औष्णिक धुरीकरण करण्यासाठी झेन फॉग व वॅन फॉग मशिन ठेवुन कामकाज करण्यासाठी आवश्यक डिझेल इंधनावर चालणारे (दोन) रिक्षा टेम्पो भाड्याने वाहन चालका सह मे.अथर्व स्वयंरोजगार औद्योगीक सेवा सह संस्था यांना दि.१/१/२०२० ते दि.३१/०५/२०२० अखेर प्रति दिन प्रती रिक्षा टेम्पो र.रु.५४१.५० प्रमाणे अपेक्षीत खर्च र.रु.१,५०,०००/- (अक्षरी र.रू.एक लाख पन्नास हजार फक्त) खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०४ | विषय क्रमांक – ०९

दिनांक – ०९/०९/२०२० | विभाग – ह क्षेत्रिय, प्रशासन

सुचक – मा.अभिषेक बारणे | अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/प्रशा/६/कावि/१०६/२०२०, दि.१२/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ह क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत प्रशासन विभागाचे अंदाजपत्रकामध्ये सन २०२०-२१ मधील "वाहन इंधन" (अधिकारी) या लेखाशीर्षवर र.रु.१,००,०००/- तरतूद करणेत आली आहे. दि.६/७/२०२० अखेर र.रु.६५,०००/- इतका खर्च झालेला आहे. पुढील नऊ महिन्या करिता र.रु.२,५०,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी खालील तक्यात नमूद केलेप्रमाणे वर्गिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशीर्ष | सन २०२०-२१ ची तरतूद. | वाढ करावयाची तरतूद. | घट करावयाची तरतूद | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| १) | वाहन इंधन (अधिकारी) | १,००,०००/- | २,५०,०००/- | -- | ३,५०,०००/- |
| २) | सार्वजनिक वाचनालय वृत्तपत्रे बिल | १०,००,०००/- | -- | २,५०,०००/- | ७,५०,०००/- |
| | **एकूण** | **११,००,०००/-** | **२,५०,०००/-** | **२,५०,०००/-** | **११,००,००० /-** |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०५ | विषय क्रमांक – १०

दिनांक – ०९/०९/२०२० | विभाग – प्रशासन

सुचक – मा.राजेंद्र लांडगे | अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशासन/९अ/कावि/१८३/२०२०, दि.२०/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

१) **श्री.उध्दव गणपती मदने, सहा.मंडलाधिकारी** यांची सेवानिवृती पुर्वीची वेतनवाढ भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन स्थगित करणेत येवुन चोरी झालेली म.न.पा नुकसानीची रक्कम २०% प्रमाणे २,८०,१७०/-वसुल करणेची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे.

२) **श्री.भाऊ सोनु गायकवाड, उपलेखापाल** यांची १ वेतनवाढ भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम न करता स्थगित करणेस व म.न.पा नुकसानीची २०% प्रमाणे र.रु.८०,१७०/- वसुल करणेची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे.

३) **श्रीम.सुनिता संतोष वाईकर, लिपिक** यांच्या दोन वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन स्थगित करणेस व म.न.पा नुकसानीची २०% प्रमाणे प्रमाणे र.रु.८०,१७०/- वसुल करणेची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे.

४) **श्री.महेंद्र अंकुश गायकवाड, लिपिक** यांची एक वेतनवाढ भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन स्थगित करणेस व म.न.पा नुकसानीची ५% प्रमाणे प्रमाणे र.रु.२०,०४३/- वसुल करणेची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे.

५) **श्री.तुकाराम बाबुराव सणस, रखवालदार** यांच्या दोन वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन स्थगित करणेस व म.न.पा नुकसानीची ३५% प्रमाणे प्रमाणे र.रु.१,४०,२९९/- वसुल करणेची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे.

प्रकरणी भोसरी पोलीस स्टेशन येथे दि.२६/०३/२००९ रोजी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे. प्रकरणी कामकाजात निष्काळजीपणा करणारे श्री.तुकराम बाबुराव सणस, रखवालदार, यांना व अन्य इतरांना दि.२६/०३/२००९ चे आदेशाने सेवानिलंबित करण्यात आले होते. तसेच त्यांची खातेनिहाय चौकशी सुरू करणेत आलेली होती. त्यानुसार प्राप्त चौकशी अहवालातील शाबीत दोषारोपांनुसार वरीलप्रमाणे अपचारी यांचे जबाबदारी नुसार व टक्केवारी प्रमाणे म.न.पा.चे आर्थिक नुकसानीची रक्कम संबंधितांकडून वसुलात करून भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करून वेतनवाढ स्थगितीची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे. श्री.सणस यांच्या जबाबानुसार ६.४० वाजता शेजारच्या बँकेच्या रखवालदाराने भोसरी करसंकलन विभागीय कार्यालयाचे शर्टस उघडे असल्याचा दूरध्वनी त्यांना केला होता. व श्री.सणस हे सकाळी सहा पर्यंत ड्युटीवर होते.त्यानंतर ते घरी गेले, याचा अर्थ ६.०५ ते ६.३० या २० ते २५ मिनीटाचे कालावधीत चोरी झाली असे श्री.सणस यांचे म्हणणे आहे. तथापि, एवढ्या कमी कालावधीतत मेनगेटची दोन कुलुपे तोडणे/ मुख्य शटरचे कडी – कोयंडे कापणे, कुलपे तोडणे पहिल्या मजल्यावरील शटरची दोन कुलुपे तोडणे कार्यालयाच्या मुख्य लाकडी कुलुप तोडणे, कॅशियर केबीन मधील कपाट फोडणे एवढ्या घटना २० ते २५ मिनिटाचे कालावधीत होणे शक्य वाटत नाही. त्यावरून चोरी ही रात्रीच झाली असून श्री.सणस हे ड्युटीचे ठिकाणी रात्रपाळीत हजर नसल्याचे स्पष्ट होत आहे. म्हणजेच चोरीची घटना ही श्री.सणस – रखवालदार यांच्या कर्तव्य काळात झाल्याने त्यांचेकडून महानगरपालिकेच्या नुकसानीची संपुर्ण रक्कम वसूल करून त्यांना सेवेतून काढून टाकणे क्रमप्राप्त होते. तथापि, श्री.सणस यांना एक संधी म्हणुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ब) आणि (इ) नुसार महानगरपालिकेचे झालेले आर्थिक नुकसानीपोटी (चोरी झालेली र.रू.३,९५,४६४/- अधिक तिजोरी दुरूस्तीची खर्च र.रू.५,३८८/-अशी एकूण ४,००,८५२/-) ३५% रक्कम म्हणजे र.रू.१,४०,२९९/- वसुल करणेबाबत व त्यांचा निलंबन कालावधी विनावेतनी करून ०२ वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करून स्थगित ठेवणेची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे. वास्तविक महाराष्ट्र महानगरपालिका अधनियमातील कलम ५६(४) अन्वये कोणत्याही नगरपालिका अधिका-यांस किंवा कर्मचा-यांस महापालिकेव्यतिरीक्त अन्य कोणत्याही प्राधिका-याकडून खालच्या पदावर आणणेत आले असेल, अथवा काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल अशी जबर शास्ती कारवाई झालेली असल्यास शास्ती कारवाई आदेशाविरूध्द १ महिन्याच्या कालावधीत, वरिष्ठ प्राधिका-याकडे अपील करता येईल अशी स्पष्ट तरतुद आहे. श्री.सणस यांनी अपिल कालावधी संपुष्टात येऊन तब्बल ०९ वर्षे ०८ महिने इतका प्रदिर्घ कालावधी उलटून गेल्यानंतर

अपिल दाखल केलेले आहे. तसेच उदधृत गैरवर्तन प्रकरणी त्यांचेवर झालेली शास्ती कारवाई जबर शास्ती कारवाई या सदरात मोडत नाही. यास्तव, अपिल दखल पात्र होत नाही. तसेच, श्री.तुकाराम बाबुराव सणस, रखवालदार यांचेवर म.न.पा. सेवेतुनच काढून टाकणेची शास्ती कारवाई करणे आवश्यक होते. मात्र त्यांना एक वेळ संधि म्हणुन त्यांचेवर केलेली शास्ती कारवाई किरकोळ व सर्वसाधारण जुजबी स्वरूपाची असुन योग्य कायदेशीर व रास्त असल्याने त्यांचे अपिल मान्य करणे योग्य होणार नाही. तरी श्री.सणस यांचा अपिल अर्ज फेटाळण्यात यावा.

**निर्णय –** प्रस्तुत प्रकरणी श्री.तुकाराम बाबुराव सणस, रखवालदार यांचेकडून मनपा नुकसानीची ३५% प्रमाणे र.रु.१,४०,२९९/- इतकी रक्कम वसूल करणेची शास्ती करणेत आली असून त्यांच्या दोन वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन स्थगीत करणेची शास्ती कारवाई करणेत आलेली आहे. सदर प्रकरणातील अन्य अपचारी कर्मचा-यांची शास्ती प्रशासनाने कमी केली आहे. श्री.सणस यांचेवर करणेत आलेली शास्ती जास्त असून त्यांचे कायमस्वरुपी आर्थिक नुकसान होणार आहे. तसेच अन्य कर्मचा-यांच्या शास्ती प्रशासनाने कमी केल्या असल्याने श्री.सणस यांचेवरील शास्तीही कमी करणे मानवतेच्या दृष्टीकोनातून योग्य व गरजेचे आहे. तरी त्यांच्या दोन वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम करुन स्थगित न करता त्यांच्या दोन वेतनवाढी भविष्यातील वेतनवाढीवर परिणाम न करता स्थगित करणेची शास्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०६ विषय क्रमांक – ११

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३४५/२०२०, दि.२४/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी विविध ठिकाणी देखरेखीखाली असणा-या (Institutional Quarantine) व Covid Care Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी र.रु.250/- प्रति दिन प्रति व्यक्ति (अक्षरी रू.र.दोनशे पन्नास फक्त) याप्रमाणे दि.25/05/2020 ते दि.09/07/2020 अखेर मे.टॅब किचन यांना अदा कराव्या लागणा-या र.रू.38,71,260/- (अक्षरी र.रू.अडोतीस लाख एक्काहत्तर हजार दोनशे साठ फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे.टॅब किचन, बाणेर रोड, पुणे 45 यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०७ विषय क्रमांक – १२

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३४६/२०२०, दि.२४/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा(COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी आवश्यक लहान व मोठे किट साहित्य ई निविदा सूचना क्र.07/2020-21 चे प्राप्त लघुत्तम दरानुसार खरेदी करणेकामी येणा-या र.रू.38,20,000/- (अक्षरी र.रू.अडोतीस लाख वीस हजार फक्त) चे खर्चास महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण 5(2)(2) नुसार कार्योत्तर मान्यता व मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स व मे.ऑर्थोन टेक्नॉलॉजिज & एंटरप्रायजेस यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०८ विषय क्रमांक – १३

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/१५/कावि/३४७/२०२०, दि.२४/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग अधिनियम 1897, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना दि. 14/03/2020 आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम (41 व 50), महानगरपालिका अधिनियम कलम 63(6) व कलम 67(3)(क) नुसार कोरोना विषाणूचा (COVID 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मनपामार्फत स्थापन केलेल्या Covid Care Center व Institutional Quarantine Center येथील रुग्ण तसेच व्यक्तिंना व मनपा व शासनाने नियुक्त केलेले कर्मचारी यांना गरजेनुसार जेवण व नाष्टा उपलब्ध करुन देणेकामी ई निविदा सूचना क्रमांक 10/2020-21 अन्वये प्राप्त झालेला लघुत्तम दर रुपये 180/- प्रति दिन प्रति व्यक्ति यानुसार एकूण 15 पुरवठादार निश्चित करणेत आलेले आहेत. त्यानुषंगाने निर्गत करणेत आलेल्या पुरवठादारांना अदा कराव्या लागणाऱ्या र.रु.180/- प्रति दिन प्रति व्यक्ति याप्रमाणे प्रस्तावात नमुद केलेल्या कालावधीमध्ये होणा-या र.रू.1,04,89,230/- (अक्षरी र.रू.एक कोटी चार लाख एकोणनव्वद हजार दोनशे तीस फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व प्रस्तावात नमूद केलेल्या पुरवठादारांबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदर काम यापुढे र.रु.१८०/- ऐवजी र.रु.२१०/- प्रतिदिन प्रतिव्यक्ती या दराने देणेस व जेवण, नाष्टयासोबत फळे/सुप उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४०९ विषय क्रमांक – १४

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – लेखा

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.लेखा/०३/कावि/१४६/२०२०, दि.२७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चव्वेचाळीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १३३.५८ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.१४.५९ कोटी बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी ६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून र.रु.९ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.२३ लाख असे र.रु.१०.२३ कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी तेवीस लाख फक्त) सन २०१९-२० च्या अंदाजित संचलन तूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे सप्टेंबर २०२० चे अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१० विषय क्रमांक – १५

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभा/५/कावि/५१०/२०२०, दि.२७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

भारतीय साथरोग अधिनियम १८९७ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) नुसार Covid-19 या विषाणूचा प्रादुर्भाव लक्षता घेता, अत्यावश्यक बाब म्हणून मागविण्यात आलेल्या EOI 06/2020-21 मधील अटी-शर्तीस अधिन राहुन ऑटोक्लस्टर येथे ५० खाटांचे आय.सी.यु. व १५० खाटांचे ऑक्सीजन बेड कार्यान्वित करणेबाबतच्या एक्सप्रेशन ऑफ इंन्ट्रेस्टमधील अटी-शर्ती विचारात घेऊन गठीत केलेल्या समितीच्या अभिप्रायास अधिन राहून तसेच मे.स्पर्श हॉस्पिटल यांनी दिनांक २६/०८/२०२० रोजी दिलेल्या पत्रास अधिन राहून त्यांनी 50 ICU Beds करीता प्रति बेड प्रति दिवस र.रु.६,४५०/- व 150 Oxygenated Beds करीता प्रति बेड प्रति दिवस र.रु.१,९५०/- इतका सादर केलेला दर स्विकृत करुन सदरचे दर विचारात घेता तीन महिने म्हणजेच ९० दिवस या कालावधीकरीता येणा-या र.रू.५,५३,५०,०००/- (अक्षरी र.रू.पाच कोटी त्रेपन्न लाख पन्नास हजार फक्त) चे खर्चास मान्यता व सदर खर्च मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोरोना निधी या लेखाशिर्षामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४११ विषय क्रमांक – १६
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्य.सा.भां.,वैद्यकिय
सुचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.अंबरनाथ कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/५११/२०२०, दि.२७/०८/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार कोरोना विषाणुचा(Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीनपरिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी तातडीने M/s.Krsnaa Diagnostics, M/s.Thyrocare व SRL Diagnostics यांना मनपाच्या नेमून दिलेल्या रुग्णालयातून Throat Swab (घशातील नमुना) Oropharyngeal/ Nasopharygeal तपासणीकामी प्रथमत: दिलेल्या आदेशात मनपामार्फत् सॅम्पल पाठविल्यास र.रु.२,०००/- व लॅबने सॅम्पल घेतल्यास र.रु.२,५००/- प्रमाणे टेस्ट करणेकामी व सदरची मुदत दिनांक ३०/०६/२०२० रोजी संपुष्टात आलेनंतर दिलेल्या मुदतवाढ आदेशात र.रु.२,०००/- प्रमाणे प्रति टेस्ट प्रमाणे दि.१२/०७/२०२० पर्यंत आदेश देण्यात आले होते. तथापि M/s.Krsnaa Diagnostics यांनी केलेल्या विनंतीनुसार दि.०९/०७/२०२० पुर्वी प्रतिटेस्ट र.रु.२,५००/- प्रमाणे व दि.०९/०७/२०२० नंतर प्रति टेस्ट र.रु.२,०००/- प्रमाणे मनपा रुग्णालयातुन प्राप्त माहितीच्या अनुषंगाने M/s.Krsnaa Diagnostics यांना र.रु.१,०७,८०,५००/- (अक्षरी र.रू.एक कोटी सात लाख ऐंशी हजार पाचशे फक्त) अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणे व M/s.Krsnaa Diagnostics यांना दिलेल्या दराप्रमाणेच M/s.Thyrocare व M/s.SRL Diagnostics यांना स्वॅब तपासणीचे बिल मनपा रुग्णालयाकडून माहिती प्राप्त झालेवर त्यांचे बिलाची अदायगी करणेकामी कोर्योत्तर मान्यता देणेची मा. आयुक्त यांची मागणी असली तरी प्रस्तुत विषयातील M/s.Krsnaa Diagnostics यांना र.रु.१,०७,८०,५००/- (अक्षरी र.रू.एक कोटी सात लाख ऐंशी हजार पाचशे फक्त) अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे. तसेच M/s.Thyrocare व M/s.SRL Diagnostics यांना स्वॅब तपासणीचे बिल अदायगी करणेकामी स्वतंत्र प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१२ विषय क्रमांक – १७
दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – विद्युत मुख्यालय
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(३) यांचे पत्र क्र.विमुका/८/कावि/१७७/२०२०, दि.२५/०८/२०२०

मा.अति.आयुक्त(३) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील (निविदा क्र.१३/०१-२०२०-२१) अन्वये मे.त्रीमुर्ती मंडप स्पीकर & इलेक्ट्रिकल्स नि.र.रू.४२,३७,२६९/- (अक्षरी र.रू.बेचाळीस लाख सदतीस हजार दोनशे

एकोणसत्तर फक्त) पेक्षा ०७.२०% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१३ विषय क्रमांक – १८

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – वैद्यकिय मुख्यालय

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/९/कावि/४३८७/२०२०, दि.२५/०८/२०२०

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोविड-१९ चा प्रार्दभाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरामध्ये कोरोना आजार किती पसरला व किती लोकांमध्ये रोग प्रतिकारक शक्ती निर्माण झाली यासाठी नागरिकांची SARS-COV 2 IgG antibodies सर्वेक्षणाबाबत मोहिम राबविणे आवश्यक आहे. याकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका व डॉ.डि.वाय. पाटील मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर यांचे संयुक्त विद्यमाने पिंपरी चिंचवड शहरामध्ये SARS-COV 2 IgG antibodies सर्वेक्षण करणेकामी चर्चा झालेली आहे. त्याअनुषंगाने मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर यांनी प्रस्तावात नमूद प्रमाणे १ ते १२ बाबींसाठी र.रु.४४,१४,९०५/- कोटेशन दिलेले आहे. त्यातील अनु.क्र.१ नुसारचा दर हा दि.०७ ऑगस्ट २०२० रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे आहे. सदरचे काम तातडीने करणे आवश्यक आहे. त्यामुळे मे.डॉ.डि.वाय.पाटील मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर यांचेशी करारनामा न करता अनामत रक्कम न घेता थेट पध्दतीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३(६) व ६७ (३)(क) नुसार व दि.०७ ऑगस्ट २०२० रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे अनु.क्र.१ चा दर व अनु.क्र.२ ते १३ चे दर प्रमाणित केल्यानुसार अपेक्षीत खर्च र.रु.४४,१४,९०५/-(अक्षरी र.रू.चव्वेचाळीस लाख चौदा हजार नऊशे पाच फक्त) व प्रत्यक्ष होणा-या खर्चास व सदरची रक्कम अगाऊ स्वरुपात मे.डॉ.डि.वाय.पाटील मेडिकल कॉलेज आणि रिसर्च सेंटर यांना अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४१४ विषय क्रमांक – १९

दिनांक – ०९/०९/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.अभिषेक बारणे

संदर्भ – मा.सहा.आयुक्त(भांडार) यांचे पत्र क्र.मभां/५/कावि/७९४/२०२०, दि.२४/०८/२०२०

मा.सहा.आयुक्त(भांडार) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य मुख्य कार्यालय व औ.प्र.केंद्र, मोरवाडी यांना आवश्यक २ नग यु.पी.एस. खरेदीकामी केंद्र शासनाच्या गव्हर्मेंट ई-मार्केटप्लेस वर GeM Bid No.GEM/2020/B/

562818 प्रसिध्द करुन मागविण्यात आलेल्या निविदांमध्ये मे.मोनार्च टॅक्नॉलॉजीज (पुणे) प्रा.लि., पुणे यांनी सादर केलेली निविदा एकूण र.रु.७,८१,०१७/- (अक्षरी र.रू.सात लाख एक्याऐंशी हजार सतरा फक्त) + कर लघुत्तम प्राप्त झालेली असुन स्विकृत करण्यात आलेली आहे. मा.आयुक्त सो यांनी यु.पी.एस. खरेदीस दि.२७/०६/२०२० अन्वये मान्यता दिली असुन त्यानुसार त्यांच्या समवेत करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक - नस/३/कावि/८६०/२०२०
दिनांक – ११/०९/२०२०

**( चंद्रकांत इंदलकर )**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**प्रत** - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.